# पोलीस आयुक्तालय,
# मिरा-भाईंदर,वसई-विरार

**सेक्टर-५, शांतीगार्डन, मिरारोड(पूर्व),जि.ठाणे ४०११०७**
Phone No.022-29451003,
Email ID- cpoffice.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**क्र.पोआ/मिभाववि/पो.भ.-2021/पोशि/ अंतिम निवड यादी/ 2023,** **दि. 23/05/2023**

## पोलीस शिपाई भरती -2021

### अंतिम निवड यादी व प्रतिक्षा यादीबाबत उमेदवारांना सुचना

1. मिरा-भाईंदर,वसई-विरार आयुक्तालयाचे आस्थापनेवर **पोलीस शिपाई** या संवर्गातील 986 पदाकरिता आयोजित केलेल्या पोलीस शिपाई भरती -2021 मध्ये लेखी परीक्षेत 40 % प्राप्त केलेल्या उमेदवारांमधून महाराष्ट्र शासन,सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्रमांक:एसआरव्ही-1017/प्र.क्र.31/98/16-अ,दि.16/03/1999 व सामान्य प्रशासन विभाग ,शुध्दीपत्रक क्रामांक संकीर्ण-1118/प्र.क्र.29/16-अ,दि.19/12/2018 व शासन निर्णय,गृह विभाग क्रमांक.पोलीस-1899/प्र.क्र.316/पोल-5 अ, दि.10/12/2020 व महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश)नियम-2011,महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश)(पहिली सुधारण)नियम 2022,महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश)(दुसरी सुधारणा) नियम 2022 व त्यामध्ये शासनाने वेळोवेळी केलेल्या सुधारणानुसार **मुळ कागदपत्रे/प्रमाणपत्रे व भरती निकषांची पुर्तता यांच्या अधिन राहून पोलीस शिपाई पदासाठी** (Provisional Select List) **व तात्पुरती प्रतिक्षा यादी** (Provisional Waiting List) दि.14/04/2023 रोजी मिरा-भाईंदर,वसई-विरार आयुक्तालयाच्या नोटीस बोर्ड व mbvv.mahapolice.gov.in व मा.पोलीस महासंचालक,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांच्या www.mahapolice.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आली होती.
2. तात्पुरती निवड यादी व प्रतिक्षा यादीतील उमेदवारांमधुन मागास प्रवर्गातुन निवड झालेल्या उमेदवारांचे नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र सत्यता पडताळणी (अनु.जाती व अनु.जमाती वगळून) तसेच समांतर आरक्षणाचे प्रमाणपत्र सत्यता पडताळणी आणि पूर्व चारित्र व वैद्यकिय तपासणी अहवालास अधिन राहुन **अंतिम निवड यादी** (Final Selection) याद्वारे मिरा-भाईंदर,वसई-विरार आयुक्तालयाच्या नोटीस बोर्ड व mbvv.mahapolice.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.
3. अंतिम निवड यादीमध्ये उमेदवराचे नावाचा समावेश झाला म्हणुन त्यास नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे समजण्यात येवू नये. अंतिम निवड यादीतील उमेदवारांनी जाहिरातीमधील महत्वाच्या सूचना व अटीच्या अनुषंगाने शैक्षणिक प्रमाणपत्रे, जातीचे प्रमाणपत्रे, समांतर आरक्षणाचे प्रमाणपत्रे, नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्रे तसेच कोणतीही वस्तुस्थिती दर्शक माहिती दडवून ठेवल्याचे अथवा खोटी माहिती/प्रमाणपत्रे दिल्याचे भविष्यात आढळून आल्यास सदर उमेदवराची निवड पुढील कोणत्याही टप्पयावर रद्द करुन कायदेशिर कारवाई करण्यात येईल. त्याबाबत उमेदवारांना कोणताही दावा/तक्रारकरण्याचा हक्क राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

**(श्रीकांत पाठक)**
**अध्यक्ष**
**पोलीस भरती निवड मंडळ तथा**
**अपर पोलीस आयुक्त मिरा-भाईंदर,वसई-विरार**